# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०७/०८/२०२४ (बुधवार)**

---

## कोळसा चोरी करून विक्री करणाऱ्या आरोपीतांना अटक

दिनांक ०६/०८/२०२४ रोजीचे ०८.०० वा. दरम्यान पोस्टे कन्हान येथील स्टाफ यांना गोपनीय माहिती मिळाली की, कन्हान ते गहूहीवरा रोड लगत रोहीत चौरसीया याच्या कोळसा टालवर चोरीचा कोळसा विक्री केला जात आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून कन्हान पोलीस स्टाफ व फिर्यादी यांनी घटनास्थळी पोहचुन मोसा क्र. एम.एच–४०/सी.व्ही–३३४९ चा चालक **आरोपी क्रं. १) रोहीत किशोर सुर्यवंशी, वय १९ वर्ष, रा. खदान नं. ६ कन्हान,** मोसा क्र. एम.एच–४०/सी.व्ही–१८९६ चा चालक आरोपी क्र. **२) अरूण छग्गीलाल कश्यप वय २१ वर्ष रा. खदान नं. ६,** मोसा क्र. एम.एच–४०/एस.–०६०९ चा चालक आरोपी क्र. **३) संजय पांडूरंग सिगने, वय ४० वर्ष रा. गोंडेगाव (न्यू),** मोसा क्र. एम. एच–४०/यु.–२८७३ चा चालक आरोपी क्र. **४) पुतन बड्डा केवट वय १८ वर्ष रा. पाणी टंकी के पास खदान नं. ६ कन्हान,** मोसा क्र. एम.एच–२७/डी.एन–८७०५ चा चालक आरोपी क्र**. ५) गुलशन भाष्कर मेश्राम, वय २५ वर्ष रा. खदान नं. ६ कन्हान** यांनी आपापल्या मोटारसायकलवर कोळसा हा कामठी उपक्षेत्र ओसीएम येथुन चोरी करून यातील आरोपी क्रं. ६) रोहीत चौरसिया यांच्या कोळसा टालवर विकतांना पोलीसांना व फिर्यादी नामे– जितेन्द्र राजेन्द्रसिंग चव्हान वय २८ वर्ष (डब्लू सी एल गार्ड) रा. लालओली तूमडीपूरा कामठी ता. कामठी जि. नागपूर यांना मिळुन आल्याने आरोपीतांकडुन असा एकुण कोळसा अंदाजे ९० टन ज्याची अंदाजे किंमती ७,००,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीतांविरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ३०३(२), ११२ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यातील आरोपी क्र. ०१), ०२), ०३), ०६) यांना अटक करण्यात आली आहे. व आरोपी क्र. ०४) व ५) यांना सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोनि उमेश पाटील, सपोनि राहूल चव्हान व इतर स्टाफ यांनी पार पाडली.

## पो.स्टे. कोंढाळी हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ०६/०८/२०२४ रोजी पोस्टे कोंढाळी येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन कोंढाळी हद्दीतील मौजा धामनगाव शिवार येथे काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे कोंढाळी येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी मौजा धामनगाव शिवार येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) मंगेश अनंताजी डोंगरे वय ४३ वर्ष रा. खैरी २) रोशन सुर्यभान डोंगरे वय २४ वर्ष रा सावळी खुर्द ३) राहुल मधुकर गायकवाड वय २७ वर्ष रा सावळी खुर्द ४) लक्ष्मण यांगराज गाखरे रा सावळी खुर्द ५) वासुदेव जवलसिंग राठोड रा. सावळी खुर्द ६) पंकज जयवंत बारंगे रा. सावळी खुर्द ७) प्रविण जयवंत भलावी रा खापरी बारोकर ८) शेख इलाई शेख गुलजार रा कोंढाळी** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०८ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन पिवळी ताडपत्री किंमती २००/— रू., बावन तासपत्ते, नगदी १३६५०/—रू. असा एकुण १३,८५०/— रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे कोंढाळी येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कोंढाळी येथील ठाणेदार सपोनि. राजकुमार त्रिपाठी, पोउपनि धवल देशमुख, सफौ राजकुमार कोल्हे, पोअं. मंगेश सावरकर, गोविंद मैंद यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर